# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.

संदर्भ : साफुपुवि/निववि/२२१ दिनांक : २५ मार्च, २०२५

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढीबाबत.**
**संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. साफुपुवि/निववि/१९६, १९७ व १९८ दि. १०/०३/२०२५**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मध्ये विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत, **ई—कंटेन्ट लॅब अपग्रेडेशन, महिला सबलीकरण व सक्षमीकरण कार्यशाळा** व **कार्यानुभव संधी (Internship ) व ऑन-द-जॉब-ट्रेनिंग** या योजनांसाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात आले असून सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी **सोमवार, दिनांक १०/०३/२०२५ ते मंगळवार, दिनांक २५/०३/२०२५** असा निश्चित करण्यात आला होता.

या पत्रान्वये सदर प्रस्ताव सादर करण्यास **मंगळवार दिनांक ०१ एप्रिल, २०२५ पर्यंत मुदतवाढ** देण्यात आली असून ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची छापील प्रत व त्यासोबत मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून **शुक्रवार** दि. ०४/०४/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्यात यावी.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे —

**www.unipune.ac.in—Home page—BOD online—Login—College Login & Password—Planning and Development**

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करतांना काही तांत्रिक अडचणी उद्‌भवल्यास **collegesupport@pun.unipune.ac.in** या ईमेल आयडीवर अथवा ०२०—७१५३३६३३ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच ऑनलाईन व्यतिरिक्त इतर पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही. मार्गदर्शक तत्वांमध्ये वेळोवेळी करण्यात येणारे बदल सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना बंधनकारक राहतील. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपली विश्वासू,

25/3/25

डॉ. वैशाली साकोरे
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)